साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * रविवार दि. ०६ जुलै २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## बोगस शिक्षक भरतीसंदर्भात विशेष चौकशी समिती नेमणार-शिक्षण राज्यमंत्री डॉ.भोयर

मुंबई, (बातमीदार):- राज्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शालार्थ प्रणालीमध्ये नियमबाह्य समावेश करुन वेतन अदा केले जात असल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये निदर्शनास आले आहे. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता मुख्यमंत्र्यांची मान्यता घेऊन अधिवेशन संपल्यानंतर एका महिन्यात आयएएस, आयपीएस, आणि न्याय व्यवस्थेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष चौकशी समिती नेमली जाईल. तसेच या समितीच्या चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्यांवर निश्चित कारवाई केली जाईल, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत सांगितले. सदस्य सुधाकर अडबाले यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, एकनाथ खडसे, संदीप जोशी, डॉ.परिणय फुके, डॉ.मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, शिक्षकांची भरती प्रक्रिया ही नियमाप्रमाणेच होते. त्यास शासन नियमाप्रमाणेच मान्यता देते. तथापि भरतीमध्ये आर्थिक व्यवहार होऊन नियमबाह्य भरती झाल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर निश्चित कारवाई केली जाईल. तसेच असे प्रकरण मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी प्रलंबित ठेवले असल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर देखील कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी याबाबतच्या उपप्रश्नाच्या उत्तरात सांगितले. ***

## वैद्यनाथ बँकेची निवडणूक जाहीर; १० ऑगस्टला मतदान

परळी वैजनाथ, (बातमीदार):- नागरी सहकारी बँकेच्या क्षेत्रात मराठवाड्यात अग्रेसर असलेल्या येथील वैद्यनाथ नागरी सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक जाहीर झाली असून १७ जागेसाठी येत्या १० ऑगस्टला मतदान होणार आहे.




बीड जिल्हा उपनिबंधक व निवडणूक निर्णय अधिकारी समृत जाधव यांनी या बँकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. बँकेच्या संचालक मंडळाच्या १७ जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया होणार आहे. ७ ते ११ जुलै दरम्यान सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नामनिर्देशन अर्ज स्वीकारले जाणार आहेत. १४ जुलै रोजी अर्जांची छाननी होऊन उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत १५ जुलै ते २९ जुलैपर्यंत आहे. अंतिम यादी व चिन्हांचे वाटप ३० जुलै रोजी होईल. मतदान १० ऑगस्टला सकाळी ८ ते संध्या ४ वा.पर्यंत होणार आहे.१२ ऑगस्टला सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीस सुरुवात होवुन त्यानंतर निकाल जाहीर होणार आहे. **दरम्यान, १७ जागेसाठी आरक्षण असे आहे :-** सर्वसाधारण १२ जागा, अनुसूचित जाती १ जागा, इतर मागासवर्गीय १ जागा, भटक्या विमुक्त व विशेष मागास प्रवर्ग १ जागा, महिला प्रतिनिधी २ जागा.

सध्या ही बँक भाजपच्या ज्येष्ठ नेत्या व पशुसंवर्धनमंत्री पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितम मुंडे यांच्या ताब्यात आहे. सध्या राजकारणात पंकजाताई मुंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आ.धनंजय मुंडे एकत्र असल्याने या बँकेची निवडणूक वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याप्रमाणे बिनविरोध होते का? याकडे सभासद, नागरिक, कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. ***

## कॉंग्रेसच्या परळी शहराध्यक्षपदी बहादूरभाई तर तालुकाध्यक्षपदी ॲड.मुंडे यांची निवड





परळी वैजनाथ, (बातमीदार):- कॉंग्रेसच्या परळी शहराध्यक्षपदी बहादूरभाई उर्फ हनीफ करीम सय्यद यांची फेरनिवड करण्यात आली आहे तर तालुकाध्यक्षपदी ॲड.प्रकाश बाबुराव मुंडे यांची निवड करण्यात आली आहे.

अखिल भारतीय कॉंग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे व ज्येष्ठ नेते माजीमंत्री अशोक पाटील यांनी या निवडी केल्या आहेत. या निवडीबद्दल श्री मुंडे व बहादूरभाई यांचे परळी तालुक्यातील कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी स्वागत करून अभिनंदन केले आहे. दरम्यान, पक्षाच्या येथील कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात बहादूरभाई यांचा कार्यकर्त्यांनी या निवडीबद्दल सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ नेते प्रकाशराव देशमुख, ॲड.शशिशेखर चौधरी, ऐतेशाम खतीब, सुभाष देशमुख, दिपक सिरसाट, बद्दरभाई, रसूलखान, फरकुंदअली बेग आदी नेते कार्यकर्ते उपस्थित होते. पक्षाने आपल्यावर विश्वास ठेवून टाकलेली जबाबदारी सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेवून पार पाडू, परळीत पक्षाची ताकद वाढविण्यासाठी आपण अहोरात्र प्रयत्न करू असे या निवडीनंतर बहादूरभाई, श्री मुंडे यांनी सांगितले. ***

## सोलापूरच्या क्रिकेट स्पर्धेत बार्शी क्रिकेट संघ विजयी

### परळीचा गौरव गादेकर ठरला सामनावीर

**परळी वैजनाथ, (बातमीदार):- सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने जे.टी.कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत एचपीपीसी बार्शी क्रिकेट अकॅडमी या संघाने विजेतेपद मिळवले आहे. या संघातील गौरव प्रमोद गादेकर हा सामनावीर ठरला आहे.**



गेल्या बुधवारी (दि.२) एचपीपीसी बार्शी क्रिकेट अकॅडमी व मॉडेल क्रिकेट अकॅडमी सोलापूर यांच्यात ही स्पर्धा झाली. नाणेफेक जिंकून मॉडेल क्रिकेट अकॅडमीने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला.

बार्शीच्या एचपीपीसी संघाने २९ षटकांमध्ये सर्व बाद करत १३६ धावा केल्या. त्यामध्ये या संघाकडून खेळणारा परळीचा गौरव गादेकर याने सहा चौकार घेत ३० धावा काढल्या. संघातील पृथ्वी खोडवे याने २५ धावा केल्या. मॉडेल क्रिकेट अकॅडमीकडून निहार पॉल याने २१ धावांत तीन, श्लोक आनंद याने एक बळी घेतला. मॉडेल क्रिकेट अकॅडमी सोलापूर संघाचा २८ धावांनी पराभव केला.

मॉडेल क्रिकेट अकॅडमीने २२ षटकांत सर्व बाद १०८ धावा केल्या. कार्तिक पाटोळे याने ३८ धावा काढल्या. एचपीपीसी संघाकडून गौरव गादेकर याने एकाच ओव्हरमध्ये तीन बळी घेतले व क्षेत्ररक्षणामध्ये एक झेल घेतला व आपल्या संघाला विजेतेपद मिळवून देण्यात गौरवने मोठा वाटा उचलला. या संघातील अर्णव जगदाळे याने तीन बळी घेतले. सामनावीर पुरस्काराचा मान गौरव गादेकर याला देण्यात आला. गौरवच्या या यशाबद्दल संघातील खेळाडू, त्याचे मार्गदर्शक व इतरांनी अभिनंदन केले आहे. ***

बचत विजेची समृद्धी राष्ट्राची !

## परळीतील अनेक निराधार मानधनापासून वंचित-तुळशीराम पवार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी तालुक्यातील निराधार, ज्येष्ठ नागरिकांचे अनुदान तात्काळ त्यांच्या खात्यात वर्ग करावे व निराधारांची होणारी फरफट थांबवावी अशी मागणी जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार) प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केली आहे.



याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात श्री पवार यांनी म्हटले आहे की, राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन व राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य, वयोवृद्ध कलाकार मानधन आदी योजना समाजातील वंचित घटकांसाठी राबविण्यात येतात. या शासनाच्या योजनेतून अनेक निराधार व गरजवंतांना आर्थिक आधार मिळत असतो. परंतु परळी तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांना गत काही महिन्यांपासून मानधन अद्याप मिळाले नाही. श्रावणबाळ योजनेचे अधिकाधिक लाभार्थी वृद्ध आहेत. ६५ वर्षांवरील वृद्धांना या वयात औषधपाण्याची गरज असते. मानधन न मिळाल्याने त्यांचा दवाखाना थांबला आहे.

याशिवाय दैनंदिन खर्चाचीही अडचण झाली आहे. मानधन कधी येणार याकडे निराधारांचे लक्ष लागले आहे. वृद्ध निराधार बांधवांचे मानधन तात्काळ त्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात यावे. व त्यांची होणारी गैरसोय दूर करावी, अन्यथा आंदोलन करण्यात येईल. असा इशारा श्री पवार यांनी दिला आहे. ***

## साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी श्री वाकेकर तर सचिवपदी प्रा.डॉ.यल्लावाड यांची निवड



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील मराठवाडा साहित्य परिषदेची बैठक ज्येष्ठ मार्गदर्शक बाळासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नुतन कार्यकारिणी गठीत करण्यासाठी मंगळवार दि.२४/०६/२०२५ रोजी सायं. ५:३० वा. कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत केंद्रीय कार्यकारिणीच्या निर्देशानुसार पदाधिकारी निवडण्यात आले. त्यात अध्यक्ष म्हणून विजय वाकेकर, सचिवपदी प्रा.डॉ.

(उर्वरित पान ४ वर)

# पहिलीची बालभारतीची नवी पाठ्यपुस्तके छानच!

## पण..शहरी भागातील मुलांना ती सोपी तर ग्रामीण भागातील मुलांसाठी जडच.!




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी चालू शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिलीत जाणाऱ्या बालमित्रांसाठी नवी छान-छान पाठ्यपुस्तके आणली आहेत. या पाठ्यपुस्तकांत नव्या जुन्या मजकूर-साहित्याचा मिलाप आहे. स्वतःहून मुलांनी शिकावे म्हणून केलेला प्रयत्न उत्तमच आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण झालेल्या मुलांसाठी ही पाठ्यपुस्तके सोपी तर ज्यांचे असे शिक्षण झालेले नाही. जी मुले पहिलीत दाखल होऊन शिक्षणाचा श्रीगणेशा करणार आहेत अशा व ग्रामीण भागातील मुलांना ती जड जाणार आहेत.

केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाचा आपल्या राज्य सरकारने स्वीकार केल्यानंतर तयार करण्यात आलेला पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम २०२४ समोर ठेऊन यंदा पहिलीत जाणाऱ्या मुलांसाठी नवी पाठ्यपुस्तके तयार करण्यात आलेली आहेत. मराठी, गणित, इंग्रजी या तीनच विषयांची नवी पाठ्यपुस्तके पहिलीत आलेल्या विद्यार्थ्यांच्या हाती सध्या देण्यात आलेली आहेत. वादात अडकलेले हिंदी विषयाचे पुस्तक दिले गेले नाही तर कला, कार्यानुभव, शारिरिक शिक्षण हे विषय एकत्रित असलेले 'हसू खेळू शिकू' हे पाठ्यपुस्तक अद्याप मुलांना दिलेले नाही. २०२४ च्या अभ्यासक्रमातील इयत्ता पहिलीच्या अध्ययन निष्पत्तींचा विचार करून नव्या पाठ्यपुस्तकांची रचना केली गेली आहे. या पाठ्यपुस्तकांचा आकार मोठा, सुबक छपाई, आकर्षक, बोलकी, आपल्या जवळची वाटणारी व रंगीत चित्रे, सुरेख मांडणी यात आहे. विद्यार्थ्यांना आवडतील ती आनंदाने शिकतील असे पाठ्यघटक या पुस्तकांत आहेत.

मुलांनी स्वतःहून शिकावे, त्यांचे अध्ययन सोपे व्हावे म्हणून केलेले प्रयत्न छानच आहेत. पाठ्यपुस्तकातील पानोपानी असलेले रंगीत सचित्र घटक अभ्यासताना, शिकताना मुले त्यात रमून जातील अशी रचना या पाठ्यपुस्तकांची आहे. यामुळे मुलांचे शिक्षण रंजक व आनंददायी होणार आहे. या पाठ्यपुस्तकांची सुरूवात संविधानाच्या उद्देशिकेने केली गेली आहे. संविधानातील नागरिकांची मूलभूत कर्तव्येही त्यात दिली आहेत. राष्ट्रगीत, प्रतिज्ञेबरोबरच 'जय जय महाराष्ट्र माझा' हे राज्यगीतही पुस्तकात छापले आहे. अध्ययन प्रक्रिया सोपी व्हावी म्हणून प्रत्येक घटकात पानोपानी शिक्षकांसाठी सूचना दिल्या गेल्या आहेत. प्रत्येक पुस्तकात शेवटी महिला आणि बालविकास आपत्कालीन मंत्रालयाची 'चाईल्ड लाईन' ही जाहिरातही छापली आहे. तसेच पाठ्यपुस्तकांना आधुनिकतेची जोड देण्यासाठी स्मार्ट फोनवर डिजीटल पाठ्यपुस्तक उपलब्ध व्हावे म्हणून क्यु-आर कोड (Q.R.Code) दिला गेला आहे. यामुळे शिक्षक, पालकांचे काम आणखी सोपे झाले आहे.

बालभारतीच्या पाठ्यपुस्तकाचे अध्ययन करत असलेले बहीण-भावाचे जुनेच चित्र मराठीच्या मुखपृष्ठावर दिले आहे. त्याभोवती अध्ययनाच्या नव्या संकल्पांची चित्रे वर्तुळात छापलेली आहेत. 'झूक झुक झुक अगीन गाडी', 'ऐ आई मला पावसात जाऊ दे..' सारख्या छान-छान जुन्या कविता काही नव्या कविता, घटक, कथा यांचा सुरेख संगम पाठ्यपुस्तकात आहे. चित्रवर्णन, चित्रकथा, स्वरचिन्हे, वाचनपाठ, भाषिक कोडी, खेळ या सारख्या नव्या गोष्टी पुस्तकात आहेत. अक्षरगटांची व वाचनपाठाची रचना मांडणी छान केली आहे. यामुळे मुले हळू-हळू वाचायला, लिहायला शिकतील. जोड शब्द, छोटी वाक्य मुले लिहू वाचू शकतील असा चांगला प्रयत्न झाला आहे. एकूणच भाषा विषयाचा अभ्यास, शाळेची गोडी विद्यार्थ्यांत वाढावी ती पक्की व्हावी म्हणून केलेले प्रयत्न उलेखनिय आहेत.

**– लक्ष्मण वाकडे**
**पत्रकार, परळी वैजनाथ.**

बालभारतीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तका प्रमाणेच इंग्रजी ही दुसरी भाषा शिकणाऱ्या पहिलीच्या मुलांसाठी 'माय इंग्लीश बूक' हे पुस्तक तयार केले आहे. या पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक आहे. आनंददायी, रंजक व कृतीयुक्त पाठ्यघटक पुस्तकात आहेत. गाणी, कविता, साभिनय तालासुरात मुले म्हणतील एवढ्या सोप्या व छान आहेत. अक्षरांची ओळख, त्यांच्या लेखन, वाचनाचा सराव मुलांना व्हावा म्हणून केलेले प्रयत्न वाखाण्याजोगे आहेत. इंग्रजी भाषा मुले आवडीने व आनंदाने शिकतील अशीच या पुस्तकाची रचना आहे. या पुस्तकाला खास इंग्लीश टच तर आहेच त्याबरोबरच आपल्या परिसरातील विविध गोष्टी, घटक, पाठ्यपुस्तकातील घटकांत असल्याने मुलांना ते अधिक जवळचे वाटतील. शब्द कोडे, छोटी वाक्ये वाचन लेखनात मुले रमून जातील असाच प्रयत्न घटकांत झालेला आहे.

गाणी, बडबडगीते, खेळ, गोष्टी अशा माध्यमातून गणिताची ओळख, गणिताच्या पुस्तकांतून करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची निरीक्षण शक्ती वाढावी, व्यवहार ज्ञानाची ओळख व्हावी म्हणून उपक्रम छानच आहे. आकार, लांबी, रूंदी, जवळ, दूर, संख्येची ओळख, बेरीज, वजाबाकी या बरोबरच नाणी, नोटा, संख्येचा लहान मोठेपणा, चढता, उतरता क्रम, मापन आदी गणितीय गोष्टी सोप्या पद्धतीने मांडल्या आहेत. संख्या लेखन व वाचनाचा सराव मुलांना व्हावा म्हणून पाठ्यपुस्तकात केलेले प्रयत्न छानच आहेत. विद्यार्थी स्वतःहून शिकण्यासाठी गणिताचा अभ्यास आनंददायी करण्याचा प्रयत्न पुस्तकांतून झाला आहे. यामुळे गणिताची गोडी मुलांना वाढण्यास मदत होणार आहे.

गणित पुस्तकावरील मुखपृष्ठावर विविध गणितीय उंची, अंतर, मोजमाप, बेरीज, वजाबाकी आदी क्रियांचे चित्रे मांडली आहेत. गणितीय संबोध, क्रिया दृढ होण्यासाठी झालेला प्रयत्न चांगलाच आहे.

एकूणच पहिलीची ही पाठ्यपुस्तके छानच आहेत. ही पुस्तके काढण्याअगोदर पूर्व प्राथमिक शिक्षणाकडे अधिक लक्ष देऊन त्यांचा पाया पक्का केला असता तर मुलांना ही पुस्तके अधिक सोपी गेली असती. असे असले तरी पूर्व प्राथमिक शिक्षण घेऊन पहिलीत आलेल्या मुलांना ही सोपी असणार आहेत तर असे शिक्षण न झालेल्या तसेच ग्रामीण भागातील मुलांना ही पुस्तके जड जाणार आहेत. अशा विद्यार्थ्यांना या पुस्तकांचे अध्ययन करणे पहिलीच्या वर्गाला शिकवणाऱ्या शिक्षकांपुढे आव्हानच असणार आहे. ****

(पान १ वरून).......**साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी श्री वाकेकर**

राजकुमार यल्लावाड , प्राचार्य अरुण पवार (उपाध्यक्ष), प्रा.संजय आघाव (कोषाध्यक्ष), अनंत मुंडे (कोषाध्य), दिवाकर जोशी (सहसचिव), प्रा.डॉ.अर्चना चव्हाण (सहसचिव), सिद्धेश्वर इंगोले (प्रसिद्धी प्रमुख), बालाजी कांबळे (संपर्कप्रमुख) या प्रमुख पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.यावेळी पुढील पाच वर्षात साहित्य परिषदेची ध्येयधोरणे निश्चित करण्यात आली. निवडीनंतर सत्कारप्रसंगी बोलताना नुतन अध्यक्ष विजय वाकेकर यांनी पुन्हा एकदा मराठवाडा साहित्य परिषद परळी शाखेला सुवर्णकाळ प्राप्त करून देण्याचा मनोदय व्यक्त केला. यावेळी मराठवाडा साहित्य परिषदेचे सदस्य उपस्थित होते. ***

### हसरा कोपरा..!



बायको : बटाटा वडा बनवू का तुम्हाला.
नवरा : नको मी माणूसच ठीक आहे, आली मोठी जादूगारीन.



### खरय.. पण...



मराठी माणसाच्या हितासाठी दोघे भाऊ एकत्र येत आहेत
तर मग प्रश्न पडतो..
कोणाच्या हितासाठी ते वेगळे झाले होते.!




संपादकीय...

# कुंपणच शेत खाते तेंव्हा..!

*** सुविचार ***
**आयुष्यात तुटलेला विश्वास, बोललेले शब्द आणि गेलेली वेळ कधीच येत नाही..!**

परळीचे वीज वितरण कार्यालय या-ना-त्या कारणाने सतत चर्चेत असते. आता या कार्यालयात तत्कालीन अधिकाऱ्यानेच केलेला वीज बील घोटाळा चव्हाट्यावर आला आहे. यामुळे वीज ग्राहक व महावितरण विभागात जोरदार चर्चा होते आहे.

परळी शहर व परिसरात घरगुती, व्यापारी व उद्योजक असे सर्व मिळून सुमारे तीस एक हजार वीज ग्राहक आहेत. या ग्राहकांना या कार्यालयाकडून होणाऱ्या गैरसोयीचा सामना सतत करावा लागतो. परळीत वीज पुरवठ्याबाबत सर्वसामान्य ग्राहकांची सतत ओरड असते. दिवसांतून अनेक वेळा वीज पुरवठा खंडित होतो. एखाद्या कामासाठी वीज पुरवठा खंडित करावयाचा असल्यास फार कमी वेळा ग्राहकांना सूचना दिली जाते. वीज पुरवठा बंद झाल्याने व सतत खंडित होत असल्याने ग्राहकांची मोठी गैरसोय होते. शिवाय व्यापारी, उद्योजकांचे मोठे नुकसान होते. या कार्यालयाकडून वितरीत होणाऱ्या परळी शहर व परिसरातील वीज ग्राहकांना देण्यात येणाऱ्या वीज देयकाबाबतही मोठी तक्रार आहे. शहर व परिसरात अनेक ग्राहकांना वीज देयके वेळेवर मिळत नाहीत. शहराच्या शंकर पार्वतीनगर, आदर्श कॉलनी, प्रियानगर, बँक कॉलनी या भागात तर वीज ग्राहकांना मागच्या कितीतरी वर्षापासून वीज देयकाचे वाटपच झालेले नाही. मग ही छापलेली बिले जातात कुठे? हा प्रश्न पडतो. एखाद्या भागात वर्षानुवर्षे वीज देयकाचे वाटप होत नाही तेंव्हा संबंधित कार्यालयाचे अधिकारी काय करतात? हा प्रश्न पडतो. जसे वीज देयकाचे आहे तसे वीज वापरानंतर ग्राहकांना येणाऱ्या वीज बीलाचे आहे. अनेक वेळा ग्राहकांना सरासरी बील दिले जाते. यामुळे ग्राहकांना नाहक कमी-जास्त बिलाचा भूर्दंड भरावा लागतो. काही ग्राहकांच्या वीज मिटरवरील वापर व आलेले बील यात मोठी तफावत असते. याबाबतही ग्राहकांची ओरड होऊन काहीच होत नाही. वीज बीलाबाबत महावितरणच्या संबंधीत कार्यालयात ग्राहक तक्रार घेऊन गेल्यास या ग्राहकांची साधी दखलही घेतली जात नाही. बऱ्याचवेळा तक्रार घेण्यासाठी या कार्यालयात अधिकारीच नसतात. ते असलेच तर 'वीज बील ऑनलाईन आहे. आम्ही काही करू शकत नाहीत.' म्हणून ते हात वर करून मोकळे होतात. यामुळे ग्राहकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. या कार्यालयात कोणताही अधिकारी येओ काहीच सुधारणा होत नाही, असा प्रकार आहे. परळी शहर व परिसरात वीज चोरीचे प्रकारही सतत पहावयास मिळतात. परंतु वीज चोरी करणाऱ्या दोषींवर कधी कारवाई झाल्याचे दिसत नाही. आकडे टाकून तसेच इतर मार्गाने अनेकजण वीज चोरी करतात. परंतु याकडे संबंधितांचे दूर्लक्षच होते. याबाबत अधिकारी का लक्ष घालत नाहीत असा प्रश्न सर्वसामान्य ग्राहकांना पडतो. या कार्यालयाकडून सर्वसामान्य ग्राहकांना चांगली सेवा मिळत नाही. वीज पुरवठा व त्यातील बिघाड, इतर कामासाठी काहींना सतत चिरीमिरी द्यावी लागत, अशी तक्रार ग्राहकांची आहे.

असा कारभार ढेपाळलेल्या या कार्यालयात एका अधिकाऱ्याने वीज बील घोटाळा करून मोठा कहरच केला आहे. काही वीज ग्राहकांची थकबाकी परळी पालिकेच्या नावावर टाकण्याचा प्रकार येथे झाला आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर महावितरणच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी परळी कार्यालयातील तत्कालीन सहाय्यक अभियंत्यावर निलंबनाची कारवाई केली आहे. या प्रकारात कोण-कोण गुंतले आहे हे चौकशीनंतर पुढे येणार आहे. हजारो रूपयांचा गैरप्रकार या प्रकारात झाला आहे. ही गंभीर बाब आहे. यापूर्वी वीज वितरण विभागाचे परळीतील कार्यालय जळाले होते. त्यावेळी काहीच झाले नाही. असा गलथानपणा व ढेपाळलेला कारभार याबाबत महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष घालायला हवे. कुंपनच शेत खाण्याचा हा प्रकार आहे. या कार्यालयाचा कारभार सुधारावा, परळीतील वीज ग्राहकांना चांगली सेवा मिळावी. वीज देयकाचे सर्व ग्राहकांना वेळेवर वितरण व्हावे, सततचा वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रकार थांबावेत, वीज चोरीला लगाम बसावा. सरासरी बील देण्याचा प्रकारही थांबला जावा अशा माफक अपेक्षा परळीतील सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या आहेत. ***

# ।। बहुता सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठली आवडी ।।

## आषाढी विशेष

**विठोबा समाजाच्या संसारात, भक्तांच्या अंत:करणात आणि भजनाच्या प्रारंभी आणि मंदिराच्या गाभाऱ्यात विसावला आहे. त्यामुळेच पंढरीला जाऊन त्याचे गोजिरे रूप डोळ्यात साठवण्यासाठी देशातील पाच राज्यांतून सुमारे बारा लाखांपेक्षाही अधिक भाविक, आषाढीवारीच्या निमित्ताने संतांचे माहेर आणि महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असलेल्या या भक्तिपीठाला येत असतात. विठोबा या भक्तिपीठाचा कुलपती आहे.**

विठ्ठल हे महाराष्ट्राचे आद्य दैवत आहे. मराठी मनाचा तो लाडका देव आहे. स्त्री आणि पुरुष, आबाल आणि वृद्ध, गरीब आणि श्रीमंत, साक्षर आणि निरक्षर, शेतकरी आणि नोकरदार, या सर्वांच्या रक्तामध्ये तो पूर्णपणे एकरूप झालेला आहे. देहाचं दुखणं सहन करताना एखादा वृद्ध म्हणून जातो, 'विठ्ठल विठ्ठल'. तेही अगदी अजाणता आणि सहजपणे. कडेवर घेतलेल्या बाळाला टाळी वाजवताना, आई शिकविते 'विठ्ठल विठ्ठल' म्हणायला. दळणाचे श्रम विसरण्यासाठी घामानं चिंब झालेली माउली म्हणते,'विठाई विठाई' आणि शेतात राबणारा बळीराजा विसावा घेताना सहजपणे म्हणतो, 'विठ्ठल विठ्ठल'.

**सुगंधाची पखरण:-** संतश्रेष्ठ तुकारामाच्या शब्दांत 'राजस सुकुमार मदनाचा पुतळा' असणाऱ्या विठोबाच्या नामस्मरणाने मलिन झालेले अंतरंग स्वच्छ होते. भक्तिरंगाने ते पूर्ण उमलते. मनाचा गाभारा प्रकाशाने अजळून निघतो. मनोभावे उत्कट हाक मारणाऱ्या भक्ताच्या हाकेला हा विठोबा धावून येतो, असा सर्वांचा अनुभव आहे. अंतरीची अनुभूती आली की, मनाला गाढ शांतीचा अनुभव येतो. आयुष्याच्या वाटेवर सुगंधाची पखरण होते. संसारी ताप, जाच पार विसरले जातात, पचेंद्रियांची गुलामी कमी होते. मन मुक्त होते, उन्नत बनते अशी अनुभूती या वारीत सहभागी झालेल्या भाविकांना येत असते. विठोबाची ही क्षमता इतर कोणत्या देवतेमध्ये असेल असे वाटत नाही. त्यामुळे या २१व्या शतकातही सुखसाधनांची समृद्धी असतानाही, वारीला जाणाऱ्या भक्तांची संख्या वाढतेच आहे. हे एक नवलच म्हणायला हवे.

विठुरायाचे हे वेड आणि पायी केली जाणारी पंढरीची वारी हे जगातले एक महान आश्चर्य आहे. लाखो वारकरी ऊन, वारा, पाऊस आणि गैरसोयी यांचा विचार न करता दरवर्षी एका अमानिक



ओढीने २०-२१ दिवस पंढरीच्या दिशेने भजन-कीर्तन व नामाचा गजर करीत चालत राहतात. यात कुठलाही लौकिक स्वार्थ साधावयाचा नसतो. महापुराचे पाणी नदीबाहेर ओसंडून जावे तसा हा भक्तांचा महापूर रस्त्यावरून वाहत असतो. या महापुरातला प्रत्येकजण फक्त 'वारकरी' असतो. वतनदार आणि रोजगारी असला कसलाही भेद उरत नाही. विठुरायाच्या वेडात केलेली ही आध्यात्मिक क्षेत्रपुरी फार मोठी सामाजिक क्रांती म्हणावी लागेल.

**समन्वयाचे रूप:-** इतर देवादिकांच्या तुलनेने या विठुरायाचे वेगळेपण असे की, मुळात हा भूमिपुत्र आणि गोपालन करणाऱ्या लोकांचा देव होता. या मंडळींची जनावरे चोरून नेणाऱ्या टोळीला विरोध करताना, ज्या वीराला हौतात्म्य लाभले, त्याचे वीरगळाच्या रूपात स्मारक करून पूजला जाणारा हा देव मानला जातो. म्हणजे हा मूळचा लोकदेव आहे. पुढे पुढे या लोकदेवाचे उन्नयन होत गेले. त्याला व्यापक आणि समन्वयाचे रूप प्राप्त होत गेले. जो गोकुळात भक्तीच्या सुखाने खेळला-बागडला आणि पुढे द्वारकेचा राजा म्हणून मिरविला, तो घनश्याम कृष्ण विठ्ठलरूपाने विराजत आहे; अशी लोकमानसाची धारणा झाली आणि ही धारणा, ही भावना साऱ्या मराठी भक्तिसाहित्यातून उसळते आहे. संतांच्या दृष्टीने कटीवर कर ठेवून विटेवर उभ्या राहिलेल्या विठ्ठलाचे वर्णन करतात, तेव्हा त्यांच्या दृष्टीने तो गोकुळीचा घननीळाच भरून राहिलेला असतो. त्यानंतर त्याला आमच्या साऱ्या संतमंडळींनी 'विष्णूसहित शीव' मानले आहे. हरिहरांचा हा झालेला संगम धार्मिक क्षेत्रात ऐक्य निर्माण करणारा व या दोन दैवतांमध्ये असणारी दरी कमी करणारा ठरला आहे. इतर राज्यात या दोन दैवतांच्या भक्तांमध्ये जी कटुता जाणवते, जो दुरावा जाणवतो; तो महाराष्ट्रात जाणवत नाही. याचे कारण म्हणजे विठुरायाच्या रूपाने या दोन दैवतांचे झालेले अद्वैत म्हणावे लागेल. एवढेच नव्हे तर आणखी काही संशोधकांनी विठुराया हे बुद्धाचे रूप आहे, असे दाखवून दिले आहे. त्याला 'जिनपुत्र' बुद्ध असे म्हटले जाते. काहींनी त्याला 'दिगंबर' असे म्हटलेले आहे. या साऱ्यांचा अर्थ असा की, संतांनी आपल्या उदार आणि उन्नत दृष्टीतून शैव, वैष्णव, बौद्ध, जैन, इ.धर्मधारांचा विठ्ठलाच्या ठायी मधुर संगम साधला आहे. असा संगम इतर दैवतांमध्ये पाहावयास मिळत नाही, हे या विठु माउलीचे वेगळेपण आहे. अनेक संप्रदाय या भूमीत उदय पावले, नांदले आणि क्षीणही झाले; परंतु विठ्ठलभक्तीची धारा मात्र, अजूनही उभ्या महाराष्ट्राची भावभूमी भिजवत आहे.

**भक्तांना अभयदान:-** हा विठुराया कोट्यवधी भाविकांना वेड लावतो, त्याचे कारण हातात कुठलेही शस्त्र नाही. कुणाच्या हातात त्रिशूल आहे. कुणाच्या हातात धनुष्यबाण आहे. कुणाच्या हातात

(उर्वरित पान ३ वर)

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायक्षेत्र) www.parliparisar.com
* वर्ष ०९ * अंक ०९ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) रविवार, दि. ०६ जुलै २०२५ * किंमत : २ रु.




आस तुझ्या दर्शनाची
मन धावे पांडुरंगा
देहभान विसरूनी
दंग तुझ्या अभंगा.
सावळे तुझे रूप, नेत्रा लागे आस
भक्ती मार्गावर पडे
त्या कोरोनाचा फास.
पंढरीची चंद्रभागा, अबोल आज
जाहली वारकऱ्यां विना तिने
कधी पंढरी पाहिली?
उदास आहे आज, नामदेव पायरी
शोध घेई तुका
भेटतो कुठे सोयरी.
दंग झाले माऊली, कुठे हरवली
मुक्ताई
मिळून सारे शोधती
दिसते का कुठे जनाई.
गोरा चोखा सावता
बोले नरहरी सेनाला
काय झाले आज
पंढरीच्या वाखरीला.
वाट पाहते रखुमाई
भोळ्याभाबड्या भक्ताची
उदास भासे तिला
मूर्ती सावळ्या विठ्ठलाची.
सोड वीट पांडुरंगा
झाली उदास पंढरी
घाल घाव आता
निर्दयी कोरोनावरी!

**-प्रा.पंजाबराव येडे**
परळी वैजनाथ.

# परळीत कृषी भवन उभारण्याच्या १ कोटी ६७ लाख रुपयांच्या निधी खर्चास प्रशासकीय मान्यता-आ.धनंजय मुंडे

मुंबई (बातमीदार):- माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी मागणी केल्याप्रमाणे सहकार व पणन विभागाने मराठवाड्यात नामांकित असलेल्या परळी वैद्यनाथ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कृषी भवन उभारण्याच्या कामासाठी १ कोटी, ६७ लाख ७० हजार रुपयांच्या निधी खर्चास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेतून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

धनंजय मुंडे यांनी यानिमित्ताने परळी मतदारसंघात दिलेल्या आणखी एका शब्दपूर्तीस दुजोरा प्राप्त झाला आहे. परळी वैद्यनाथ कृषी उत्पन्न बाजार समिती ही मराठवाड्यात वैभव संपन्न बाजार समिती म्हणून ओळखली जाते. शिवाय ज्योतिर्लिंग स्थळ असल्याने येथील कृषी उत्पन्न बाजारपेठ मोठी आहे. त्यामुळे येथे विविध कामांसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना निवारा व सर्व सोयी एकत्र उपलब्ध होण्याच्या दृष्टीने येथे शेतकरी भवन उभारण्याच्या कामासाठी निधी मंजूर करण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी केली होती. त्यानुसार सहकार विभागाने आज प्रशासकीय मान्यता दिली आहे. याबाबत बाजार समितीचे सभापती सूर्यभान मुंडे, उपसभापती श्री जाधव, सचिव बलवीर रामदासी यांनीही आ. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला. तसेच त्यांनी श्री मुंडे यांच्या सह सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत. ***

# नवीन भक्तनिवासाची इमारत भाविकांसाठी सुरू करा-अॅड.मनोज संकाये

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- परळी नगरीतील प्रभू श्री वैद्यनाथ हे देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असून, इथे दररोज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातून हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. विशेषतः श्रावण महिना सुरू होताच लाखो श्रद्धाळू परळीत दाखल होतात. यामुळे शहरात भाविकांची मोठी गर्दी निर्माण होते. मात्र, भाविकांच्या निवास व्यवस्थेचा प्रश्न कायम आहे. सध्या परळीत भाविकांसाठी पुरेशी निवास व्यवस्था उपलब्ध नसल्याने भाविकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

हीच बाब लक्षात घेता, परळी नगरपालिका कार्यालयालगत तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत नव्याने बांधण्यात आलेले भक्त निवास सध्या पूर्णत्वास गेले आहे. हे भक्त निवास भवन, भाविकांच्या सेवेसाठी लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात यावे, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते अॅड. मनोज संकाये यांनी केली आहे.

मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात अॅड. मनोज संकाये यांनी नमूद केले की, श्रावण महिना सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक आहेत. लाखो भाविक परळीत येणार आहेत. मात्र त्यांच्यासाठी योग्य निवासाची व्यवस्था नसेल, तर ही



भाविकांसाठीच नव्हे तर परळीच्या यशाचीही शोकांतिका ठरेल. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ निर्णय घेऊन हे भक्त निवास कार्यान्वित करावे असे म्हटले आहे.

भाविकांना निवासाची सुविधा उपलब्ध करून दिल्यास त्यांना मानसिक व शारीरिक आराम मिळेल, परळीतील तीर्थक्षेत्राचे महत्त्व अधिक वाढेल, भाविकांचा प्रवास अधिक समाधानकारक व सुरक्षित ठरेल, तसेच शहराच्या पर्यटन विकासालाही चालना मिळेल.

अशा या गरजांच्या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने तातडीने पावले उचलून नव्याने बांधलेले भक्त निवास श्रावण महिन्यापूर्वीच भाविकांच्या सेवेसाठी खुले करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अॅड.मनोज संकाये यांच्यासह शिरीष सलगरे ,कैलास रिकीबे ,संतोष चौधरी ,प्रवीण रोडे ,राजू वायबसे ,संतोष कांबळे इतर मित्र मंडळाचे सदस्य पदाधिकारी उपस्थित होते. ***

## अत्याचार प्रकरणात 'एसआयटी' स्थापन करणार-मुख्यमंत्री

मुंबई, (जि.मा.का.):- बीड येथील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. सदस्य चेतन तुपे यांनी यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, वरिष्ठ महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'एसआयटी'ची स्थापना करून या प्रकरणाची कालबद्ध चौकशी करण्यात येईल.

तसेच दोषींवर कठोर कारवाई करून दोषींना पाठीशी घालणाऱ्या सर्वांवरही कठोर कारवाई करण्यात येईल. ***

## दरवळणारा सुगंध...



**वारी म्हणजे शिस्त, सहवास, समर्पण आणि भक्ती यांचे अद्वितीय संमेलन. वारी म्हणजे चालणं नाही, तर चालताना प्रत्येक पावलात 'मी' गाळून 'आपण' पेरणं हेच वारीचं खरे गूढ आहे.**

**माऊलीकडे पाहिलं की आपल्याला देव, आई आणि गुरु या तिघांची अनुभूती एकत्र होते, ती वारी..!**

(पान १ वरून)....

## ।। बहुता सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठली आवडी ।।

कुऱ्हाडीसारखे शस्त्र आहे. कुणाच्या हातात चाबूक आहे. कुणाच्या हातात तलवार आहे. विठोबा असा देव आहे की, कमरेवर हात ठेवून स्नेहपूर्ण नजरेने भक्तांना अभयदान देतो. एवढेच नव्हे तर विठोबाला कुठलेही वाहन नाही. मोर, गरूड, हत्ती, वाघ, घोडा, उंदीर अशा वाहनावर आरूढ असणारे देव आपण पाहतो; पण याच्या पायांखाली फक्त भाजलेली वीट आहे. त्याच्या पायाखाली असलेल्या विटेलाही सूचक अर्थ असावा असे वाटते. ही वीट दुहेरी काम करते. ती भिजते आणि आपल्या मनाचे बांधकाम करते. संसाराचा वीट आला तरी हरिनामाचा वीट ती येऊ देत नाही. विठुरायाच्या पायाखालची वीट आपणाला असा भावार्थ सूचित करते की, आपला देह हा मातीपासून निर्माण झाला आहे आणि तो शेवटी मातीत विसावला जाणार आहे, म्हणून या मातीचे विस्मरण होता कामा नये. जीवनाचे क्षणभंगुरत्व विसरता कामा नये. फार तर ती भाजून घ्यावी, म्हणजे काम, क्रोध, मद, मोह, आसक्ती, भोग या विकारांना काबूत ठेवून जगावे. हा संदेश ती वीट देत असावी. याची उपासना करताना कुठलाही डामडौल लागत नाही. या आपल्या विठुरायाला कोंबडा कापावा लागत नाही. बोकडाची हत्या करावी लागत नाही. त्यांच्या रक्ताचा अभिषेक करावा लागत नाही. या देवाला भांग, गांजा लागत नाही, त्याला नवस बोलावा लागत नाही. नवस न फेडणाऱ्या भक्तांवर तो सूड उगवत नाही, म्हणजे भक्तीच्या नावाखाली कर्मकांडांचे स्तोम माजविणारा हा देव नाही. त्याला साधा तुळशीचा हार घातला तरी तो प्रसन्न होतो. एखादे फूल पायाशी ठेवले तरी तो भक्ताला कृपाशीर्वाद देतो. त्याच्या उपासनेसाठी गळ्याइतक्या पाण्यात उभे राहावे लागत नाही. कायाक्लेश करत स्वत:चे हाल करावे लागत नाही. विशिष्ट कपडे आणि विशिष्ट पदार्थ खाल्ले पाहिजेत असा त्याचा दंडक नाही. एका पायावर उभे राहून नामस्मरण करणे, फक्त एकच वेळ जेवणे, फक्त पांढरा पदार्थ खाणे वा वर्ज्य करणे, असली व्रते करायलाही तो सांगत नाही. हा देव इतका सामान्य माणसाच्या पातळीवर उतरला आहे व त्याला भाजी-भाकरीचा नैवेद्यही चालतो. त्यात त्याचे समाधान होते. अलीकडच्या काळात त्याच्या सेवकांनी इतर काही गोष्टी केलेल्या असल्या तरी ती विठुरायाची मागणी नाही.

**सोपी आचारसंहिता:-**

विठुरायाच्या भक्तिसंप्रदायाची आचारसंहिता खूप वेगळी आहे आणि सोपी आहे. चंद्रभागेचे स्नान, तुळशीची गळ्यात माळ, कपाळी गंध, विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा आणि विठुरायाचे नामस्मरण करणे या गोष्टी केल्या तरी हा विठोबा असा एकमेव देव आहे की, ज्याच्या चरणावर माथा टेकवून त्याचे तृप्त दर्शन होते. शिर्डीच्या साईबाबांचे दर्शन दहा फुटांवरून घ्यावे लागते. बालाजीचे दर्शनही जवळ जाऊन मूर्तीला स्पर्श करून घेता येत नाही. इतर देवदेवतांचे दर्शनही दूर अंतरावरूनच घेता येते. असे दर्शन झाले नाही तर अनेक वारकरी त्याच्या मंदिराच्या कळसाचे दर्शन घेऊन समाधान पावतात. पण आपल्या प्रमाणेच विठ्ठलासाठी आलेल्या कुणी अपरिचित वारकरी समोर आला तर त्याच्यामध्येच विठ्ठलास पाहून, ते दोघेही एकमेकांच्या चरणांना स्पर्श करून भक्तिभावाने नमस्कार करतात. वारकऱ्यांमध्येच विठ्ठल पाहणे ही किमया फक्त पंढरीमध्येच आपणास पाहावयास मिळते. विठुरायाचे हे वेगळेपण म्हणावे लागेल.

**जगण्याची ऊर्जा:-** या विठुरायाने गेल्या नऊशे वर्षांपासून सामान्य माणसाला जगण्याची ऊर्जा पुरवली आहेच, पण त्याबरोबरच एक फार मोठा संदेश सर्व संतांच्या साहित्यातून आपल्या मनावर कोरलेला आहे. तो संदेश म्हणजे परमेश्वराच्या प्राप्तीसाठी संसारी माणसाला संसाराचा त्याग करण्याची गरज नाही. हिमालयात जाऊन आणि गुहेमध्ये बसून तपश्चर्या करण्याची गरज नाही. प्रपंचाला परमार्थाची जोड देता येते. प्रपंचाला डोळे नसतात आणि परमार्थाला पाय नसतात. म्हणून जीवनाची अंतिम यात्रा सुखासमाधानाची व्हावयाची असेल तर प्रपंचाने परमार्थाला आपल्या खांद्यावर घेऊन, त्याने दाखवलेल्या दिशेने वाटचाल केली तर जीवनाला पूर्णत्व प्राप्त होते, हा संदेश विठुरायाच्या थोर संतांनी आपल्या साहित्यातून समाजासमोर ठेवला. आपला विहित व्यवसाय करतानासुद्धा मुखाने नामस्मरण केले तरी तो प्रपंच बाधत नाही. म्हणूनच सावतामाळ्याला पिका-पाण्यात विठोबा दिसला. जनाबाईच्या दळणाला तो भावला. गोरोबा कुंभाराला मातीची मडकी करताना उभा असलेला दिसला. म्हणून प्रत्येक संसारी माणसाने आपला उद्योग करीत असताना, परमार्थ साधला तर विकृतीने आणि आसक्तीने गढूळ झालेला प्रपंच माणसाला बद्ध करीत नाही; या चिरंतन सत्याचा साक्षात्कार घडविणारा विठुराया आहे. म्हणून संसारी माणूस आषाढी वारीच्या निमित्ताने या संसाराकडे पाठ फिरवतो.

**मूल्यांची उपासना:-** केवळ प्रपंच आणि परमार्थ यांच्या अद्वैत रूपासाठीच विठोबा आठवावा असे नाही. मानवी जीवनाला श्रीमंत आणि समृद्ध करणारी जी चिरंतन मूल्ये आहेत, त्याचे अनुसरण व्हावे, ती आचरणात आणावीत यासाठीही आज विठोबा आवश्यक आहे. आपल्या ज्ञानोबापासून तो विठोबापर्यंतच्या साऱ्या संतांनी या जीवनमूल्यांचा उद्घोष केला आहे. त्यांचे श्रेष्ठत्व पुन्हापुन्हा विशद केले आहे. सदाचार, सद्विचार, पावित्र्य, चारित्र्य, नीतिमत्ता, औदार्य, सेवा, करुणा, अनासक्ती आणि समर्पण यांसारख्या मूल्यांच्या उपासनेतूनच व्यक्तीचे कल्याण होऊ शकते, हा संदेश आपणाला संतसाहित्य देत आहे. पैशाला परमेश्वर मानणाऱ्या, शरीर सुखोपभोगांना शरण गेलेल्या, चंगळवादाची शिकार बनलेल्या आणि दुसऱ्याचे शोषण करून; त्याच्या जिवावर राजविलास भोगणाऱ्या आजच्या समाजाला या चिरंतन मूल्यांची अधिकच गरज आहे. आज माणसातला पशू हिंस्त्र झाला आहे आणि त्याच्यातले देवत्व विझत चालले आहे. अशा शरीरसुखाने तृप्त आणि आत्मिक सुखाने अतृप्त असलेल्या समाजासाठी, विठुराया भक्तीसाठी नसला तरी या शाश्वत मूल्यांसाठी खूप गरजेचा आहे, यात शंका नाही. ही सारी वैशिष्ट्ये केवळ विठुरायाच्या ठिकाणी सामावलेली असल्याने श्री ज्ञानदेव म्हणतात-

***बहुता सुकृताची जोडी ।***
***म्हणुनी विठ्ठली आवडी ।***
***सर्व सुखाचे आगर ।***
***बापरखुमादेविवर***

**- डॉ.द.ता.भोसले**
(लोकराज्यवरून साभार)